१ जुलै, २०१९

# गुरुपौर्णिमा :
# चित्तवेधक पूर्णचंद्र

आत्मीय वाचकांनो,

शुभ गुरुपौर्णिमा! पूर्णचंद्राच्या या प्रकाशाचे आच्छादन आपणा सर्वांना प्राप्त व्हावे ही सदिच्छा! हिंदू पंचांगानुसार आषाढ या महिन्यातील पौर्णिमेचा हा चंद्र वर्षभरातील सर्वात तेजःपुंज, सर्वात प्रकाशमान चंद्रमा असतो, जो २०१९मध्ये १६ जुलैला पाहायला मिळणार आहे. भारतातील बहुतांशी सर्व सणवार हे चंद्राच्या खगोलीय परिभ्रमणानुसारच असतात. त्यामुळे दरवर्षी, प्रत्येक सण हा इंग्रजी कॅलेंडर गणनेनुसार वेगवेगळ्या तारखांना येत असतो.

गुरुपौर्णिमेची गूढ परंपरा प्राचीनकालीन भारतात सुरू झाली. आदरणीय महर्षी वेदव्यासांच्या शिष्यांनी त्यांना एकदा प्रश्न केला की, शिष्यांसाठी त्यांच्या श्रीगुरूंचा, म्हणजेच महर्षी वेदव्यासांचा सन्मान व पूजा करण्यासाठी समर्पित असा एखादा कोणता दिवस असू शकेल. महर्षी वेदव्यासांकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाबद्दल ते अतिशय कृतज्ञ होते आणि त्या ज्ञानाचा उपयोग जगाच्या कल्याणासाठी करण्याचा त्यांचा मानस होता. शिष्यांच्या या हृदयस्थित उद्देशाने महर्षी प्रसन्न झाले आणि त्यांनी शिष्यांच्या इच्छेला मान्यता दिली. आषाढ महिन्यातील पौर्णिमेचा दिवस हा शिष्यांनी त्यांच्या श्रीगुरूंचा सन्मान करण्याचा दिवस म्हणून निवडला गेला. अशा प्रकारे, गुरुपौर्णिमा साजरी करण्याची ही अतिशय सुंदर प्रथा जन्मास आली. हा समाचार शिष्यांनी सर्वांना सांगितला आणि तेव्हापासून भारतातील लोकांनी त्यांच्या यात्रांद्वारे ही पावन परंपरा जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचवली.

सिद्धयोग मार्गावर, आपण सर्व सिद्धयोगी नित्यनेमाने आपल्या श्रीगुरूंची, श्रीगुरुमाईंची पूजा करतो. आपण पूजा यासाठी करतो की, त्यांनी त्यांच्या प्रज्ञानाने आपली हृदये प्रकाशित केली आहेत, त्यांनी भगवंताला जाणण्यासाठी आपल्या अंतरात तीव्र उत्कंठा जागृत केली आहे आणि त्यांनी प्रदान केलेल्या त्या शिकवणींसाठी, ज्या आपल्या अंतरातील दिव्यतेला जाणण्याच्या आपल्या यात्रेला मार्गदर्शन

करतात. असे जरी असले, तरी गुरुपौर्णिमेच्या या सुंदर परंपरेला पुढे नेत असताना, आपल्याला या विशेष दिवशी एकत्रित येऊन गुरुमाईंचा सन्मान आणि पूजा करावयास आवडते. गुरुमाईंच्या शिकवणींमधून आपण हे शिकलो आहोत की, साधनेच्या मार्गाचे अनुसरण करत व त्याद्वारे मिळणाऱ्या आनंदाचा व शांतीचा आस्वाद घेत एक उद्देशपूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन कसे जगावे.

एका मुमुक्षूच्या जीवनात असलेल्या श्रीगुरूंच्या महत्त्वाविषयी, चौदाव्या शतकातील शैव ग्रंथ 'कुलार्णव तंत्र' यात असे सांगितले गेले आहे :

*भोगमोक्षार्थिनां ब्रह्मविष्ण्वीशपदकांक्षिणाम् ।*
*भक्तिरेव गुरौ देवि नान्यः पन्था इति श्रुतिः ॥*

> तुम्हाला कदाचित एखाद्या सांसारिक भोगाची कामना असेल; असेही असू शकते की, तुम्ही मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करत असाल; तुमची अशी आकांक्षा असू शकते की, तुम्हाला ब्रह्मा, विष्णू, शिव यांची परम अवस्था प्राप्त व्हावी.
>
> तुमच्या उत्कट इच्छेची पूर्ती करण्याचा *एकमेव* मार्ग आहे, गुरुभक्ती; याव्यतिरिक्त इतर कोणताही मार्ग नाही.[१]

* * *

मी तुम्हा सर्वांशी संवाद साधण्यासाठी उत्सुक आहे, कारण तुमच्यापैकी बऱ्याच लोकांनी मला सांगितले की, तुम्ही 'मधुर सरप्राइझ्, २०१९'मध्ये पुन्हापुन्हा सहभागी होत आहात. तेव्हा गुरुमाईंची ही शिकवण तुमच्या स्मरणात असेलच. त्या म्हणतात की, आपल्या मनाला त्याचा स्वतःचा प्रकाश पाहता यावा यासाठी आणि मनाने त्याच्या स्वतःच्या प्रकाशाचा आनंद लुटावा यासाठी त्याला मदत करण्याचा एक मार्ग हा आहे की, आपल्या जीवनातील 'व्यस्तता काही प्रमाणात कमी करणे.' माझ्या हे लक्षात आले आहे की, ही शिकवण माझ्यासाठी खूप अनमोल आहे. माझ्या दिनचर्येतील 'व्यस्ततेला' जाणीवपूर्वक काही प्रमाणात कमी करत, मी माझ्या मनाला विश्रांत होण्यासाठी एक मोकळे अवकाश खचितच निर्माण करू शकते. ही गोष्ट असा विचार करण्यास मला प्रवृत्त करते की, "खरच मला याचे कुतूहल आहे की, इतर लोकांना त्यांच्या जीवनातील 'व्यस्तता' काही प्रमाणात कमी करण्याचे कोणते मार्ग सापडले आहेत. . ."

आणि म्हणूनच मला तुम्हाला हे विचारायला आवडेल की, “दिवसभरातील तुमची ही व्यस्त मनःस्थिती कमी करण्यासाठी *तुम्ही* असे काय कराल, की जेणेकरून तुमच्या मनाला विश्रांत होण्यासाठी काही मौलिक क्षण उपलब्ध होतील, जेणेकरून तुम्ही त्या मधुर अवस्थेचे रक्षणकर्ते बनाल?”

मी हे सांगू इच्छिते की, माझ्या मनाला विश्रांत होता येईल असा क्षण देण्याचा मार्ग जेव्हाजेव्हा मला सापडतो, तेव्हा मी काय करते. मी पुन्हापुन्हा ते विकसित करत राहते, जे माझ्या मनाला त्याच्या स्वतःच्या दीप्तीमध्ये स्नान करण्यासाठी साहाय्यभूत होत असते.

अशी कल्पना करा की, गुरुपौर्णिमेच्या तेजस्वी चंद्राला तुम्ही निरखत आहात आणि त्याच्या समोरून ढगांच्या पुंजक्यांना वारंवार पुढे जाताना तुम्ही पाहत आहात. चंद्र दृश्यमान जरी नसला, तरी तुम्ही हे जाणता आहात की, तो तिथे उपस्थित आहे आणि ढग तिथून निघून जाताच चंद्रमा तुम्हाला पुन्हा दिसणार आहे. त्याच प्रकारे, मनाचा प्रकाश सतत देदीप्यमान असतो. फक्त स्वतःच्या व्यस्त मनःस्थितीचे ढग बाजूस सारण्याचा प्रयत्न आपण हळूहळू करत राहायला हवा. यामुळे मनामध्ये मोकळे अवकाश निर्माण होते, जेणेकरून मन स्वतःच्या तेजस्वीतेकडे अनिमिष दृष्टीने पाहू शकेल.

* * *

आपण खूप भाग्यवान आहोत की, गुरुपौर्णिमेच्या या शुभप्रसंगी, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर बरेच काही उपलब्ध होणार आहे. आपण वेबसाइटवरील शिकवणींशी ज्या वेळी जोडले जातो, त्या वेळी आपल्या ज्ञानात भर पडते, आपला अनुभव सखोल होतो, आपली समज सुस्पष्ट होत जाते, आपले स्वतःशी आणि इतरांशी असलेले अनुसंधान दृढ होते. सिद्धयोग मार्गाची वेबसाइट, या जुलै महिन्यात गुरुपौर्णिमेशी संबंधित अनेक महत्त्वाच्या गोष्टी प्रसारित करणार आहे, त्याचबरोबर तुमच्या गुरुमाईंच्या संदेशाच्या अभ्यासात सातत्य ठेवण्यासाठी इतर काही साहित्यदेखील. त्यांपैकी काहींवर प्रकाश टाकायला मला आवडेल :

- गुरुपौर्णिमेचे आमंत्रण : भारताच्या प्राचीन परंपरांमध्ये रुजलेल्या गुरुदक्षिणेच्या पावन अभ्यासाच्या माध्यमातून, सिद्धयोगी प्रज्ञानाचे आणि कृपेचे उगमस्थान असलेल्या श्रीगुरूंचा सन्मान करतात.
- गुरुपौर्णिमा धारणा : दररोज ध्यानाला बसताना या धारणेचे श्रवण तुम्ही करू शकता.

- गुरुपौर्णिमेच्या चंद्राची छायाचित्रे : विश्वभरातील सिद्धयोगी गुरुपौर्णिमेच्या तेजःपुंज अशा पूर्ण चंद्राची छायाचित्रे पाठवतात, जी इथे प्रसारित केली जातात. तुम्ही जिथे कुठेही राहत असाल, तेथील चंद्राची छायाचित्रे पाठवून तुम्हीदेखील या प्रसारणात सहभागी होऊ शकता.
- ध्यान-सत्र ७ : *Be Present with the Fullness of the Pure Mind.*
- ईशा सरदेसाई यांच्या द्वारे लिखित नवीन कथा, ज्या तुम्हाला गुरुमाईंचा संदेश २०१९चे अध्ययन करण्यास अधिक मदत करतील.
- २३–२६ ही अभ्यास-पत्रे : गुरुमाईंचा संदेश २०१९च्या तुमच्या अभ्यासाला सातत्यपूर्णतेने सुरू ठेवण्यासाठी.

याशिवाय, या महिन्यात अजूनही काही घटना आकाशात घडणार आहेत. दोन ग्रहणे होणार आहेत. सूर्यग्रहण २ जुलैला असेल, जे मुख्यतः दक्षिण अमेरिकेत दिसेल. चंद्राचे खंडग्रास ग्रहण १६ जुलैच्या रात्री असेल, जे उत्तर अमेरिका सोडून जगातील सर्वाधिक प्रदेशांत दिसेल. ग्रहण कालात तुमच्या आध्यात्मिक अभ्यासांचे बहुविध लाभ वृद्धिंगत होतात.

* * *

मला प्रिय असलेला सिद्धयोग अभ्यास आहे, ‘गुरुपूजा’ तीदेखील विशेषतः गुरुपौर्णिमेच्या महिन्यातील गुरुपूजा, जो महिना समर्पित असतो श्रीगुरूंची पूजा अंतःकरणपूर्वक करण्यासाठी. मी तुम्हाला हे सांगू इच्छिते की, तुम्ही गुरुपूजेला मानसपूजेच्या स्वरूपातही अर्पण करू शकता किंवा बाह्य पूजाकर्माच्या स्वरूपातदेखील. मी जेव्हा गुरुपूजा करत असते, तेव्हा माझे मन त्यावर एकाग्र होते, अगदी त्याच प्रकारे, ज्या प्रकारे समुद्रातील लाटा चंद्राकडे खेचल्या जातात. ही एकाग्रता आंतरिक आनंदात भर घालते. माझे मन त्याच्या अंतरातील त्या शांतीदायक स्थानी जेव्हा प्रवेश मिळवते, तेव्हा दैनंदिन कार्यकलाप करत असताना ते मला माझ्या हृदयाशी जोडले जाण्याचा मार्ग प्रदान करते. तर मग, तुम्हाला वेळ द्यावयास आवडणार नाही का, दिवसभरात किंवा सायंकाळ समयी पूजाअर्चा करण्यासाठी आणि तुमच्या स्वतःतील अमृतांशाला शोधण्यासाठी? हे सर्व तुम्हाला तुमच्या मनातील ते मधुर आणि कोमल स्थान शोधायला मदत करेल, ज्याकडे तुम्ही पुन्हापुन्हा परतू शकाल.

तुम्हाला हे पत्र लिहित असताना, सोळाव्या शतकातील संत-कवयित्री मीराबाई यांचे हे भजन मला आठवले. या भजनात मीराबाई त्यांच्या जिवलगाची, भगवान श्रीकृष्णाची पूजा करण्याच्या रितींची कल्पना करतात. मीराबाई म्हणतात :

*मैं बगियन से फूल को चुन के*
*प्रभु के चरण चढ़ाऊँगी...*
*श्रद्धा भक्ति प्रेम से प्रभु मैं*
*दर्शन उनका पाऊँगी।*

बागेतून फूले निवडून आणून
ती मी माझ्या परम प्रिय प्रभूंच्या चरणी अर्पण करेन. . .
श्रद्धेने, भक्तीने आणि प्रेमाने
मी माझ्या परम प्रिय प्रभूंचे दर्शन घेईन.

हे भक्तिरसपूर्ण शब्द तुम्ही वाचू शकता आणि श्रीगुरूंची मानसपूजा करत आहात अशीही कल्पना करू शकता.

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

---

[१] कुलार्णव तंत्र १२:४०. इंग्रजी भाषांतर. © २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.